**ठळक बातम्या**

- रबी हंगामासाठी खतांवर ३७ हजार ९५२ कोटी अनुदान देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय, आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मंजुरी

- विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला राज्यमंत्रिमंडळाची मान्यता

- अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी आणखी ११ हजार कोटी रुपयांच्या वितरणाला मंजुरी, पुढच्या १५ दिवसांत खात्यावर जमा होणार

- राज्यातल्या सर्व विद्यापीठांनी दर तीन महिन्यांनी राजभवनाला कार्यअहवाल सादर करावा असे राज्यपालांचे निर्देश

**आणि**

- महिला क्रिकेटमधे एकदिवसीय क्रिकेट मानांकनात स्मृती मंधाना अग्रस्थानी

<><><><><>

रबी हंगामासाठी खतांवर ३७ हजार ९५२ कोटी अनुदान देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक आज नवी दिल्लीत झाली, त्यानंतर वार्ताहरांशी बोलताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. यामुळे शेतकऱ्यांना वाजवी दरात खतं उपलब्ध होतील, असं वैष्णव म्हणाले. खतांचे आंतरराष्ट्रीय दर लक्षात घेऊन खतांच्या अनुदानाचे नवे दर निश्चित केल्याचं त्यांनी सांगितलं. हे दर एक ऑक्टोबरपासून लागू होतील.

आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. विविध मंत्रालयं, राज्य सरकारं यांच्याशी चर्चा केल्यानंतर या संदर्भ अटी निश्चित केल्या गेल्या, असं वैष्णव यांनी सांगितलं. न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आठवा वेतन आयोग अठरा महिन्यांच्या आत आपल्या शिफारशी करेल, याचा लाभ ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार आहे, असं वैष्णव म्हणाले.

<><><><><>

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला राज्य सरकारनं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. यानुसार व्हीएमयू अर्थात विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट गठित करण्यात येणार आहे. नागरिकांकडून अभिप्राय मागवून त्यांचं कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण करून दस्तावेज तयार केलं जाईल. या अंतर्गत १६ संकल्पना आणि शंभर उपक्रम निश्चित केले जाणार आहेत. शाश्वत नागरी आणि शहरी विकास, प्रगतीशील शेती, सर्वसमावेशक शिक्षण आणि कौशल्य विकास तसंच सुशासन हे या उपक्रमांचं उद्दिष्ट आहे.

याशिवाय मंत्रिमंडळानं आज सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चाला आणि राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्श्यानुसार अधिकचा निधी द्यायला, सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार करायला मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तसंच धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालयालाही शासनानं मंजुरी दिली आहे.

**<><><><><>**

अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी आणखी ११ हजार कोटी रुपये पुढच्या १५ दिवसांत शेतकर्‍यांच्या खात्यावर जमा होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी सुमारे ३२ हजार कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे. त्यापैकी आतापर्यंत ८ हजार कोटी रुपयांचं वितरण केलं आहे. आणखी ११ हजार कोटी रुपये वितरित करायला आज मंत्रिमंडळ बैठकीत विशेष बाब म्हणून मान्यता दिली असून, ही मदत पुढच्या १५ दिवसांत शेतकर्‍यांच्या खात्यावर जमा करण्याचे नियोजन केलं आहे, असं त्यांनी सांगितलं.

शेतमालाच्या खरेदीसाठी राज्यात नोंदणी सुरू केली जात असून यासाठी नोंदणी करण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

भारत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असून त्या दिशेने ठोस पावलं उचलत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत आयएसए अर्थात आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या आठव्या अधिवेशनाला संबोधित करत होत्या. हवामान बदलाचा संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होत आहे. त्याचा सामना करण्यासाठी तातडीने आणि ठोस पावलं उचलण्याची गरज असून त्यासाठी सूर्य हा सौर उर्जेचा शाश्वत स्रोत महत्त्वाचा असल्याचं राष्ट्रपतींनी यावेळी म्हणाल्या.

**- होल्ड... बाईट - राष्ट्रपती - -**

**<><><><><>**

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, तसंच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या हक्कांसाठी नागपूरमध्ये आज राज्यभरातील शेतकरी संघटना महाएल्गार आंदोलन करत आहेत. आंदोलनात शेतकरी, दिव्यांग, मच्छिमार, मेंढपाळ सहभागी झाले आहेत. या आंदोलनात माजी गृहमंत्री अनिल देशमुख सुध्दा सहभागी झाले आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू जमलेल्या शेतकऱ्यांना संबोधित करणार आहेत. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री निवास असलेल्या रामगिरीची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. काँग्रेससह अनेक शेतकरी संघटनांनी या मोर्चाला पाठिंबा दिला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व विद्यापीठांनी दर तीन महिन्यांनी राजभवनाला कार्यअहवाल सादर करावा असं राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सांगितलं आहे. राज्यातल्या अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंशी आज कुलपती या नात्याने दूरदृष्यप्रणालीमार्फत ते बोलत होते. या अहवालात आपल्या अडीअडचणी मांडाव्या असं त्यांनी सांगितलं. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावी तसंच राष्ट्रीय गुणांकन सुधारावं अशी सूचना राज्यपालांनी केली.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे एकदिवसीय क्रिकेटच्या मानांकनात भारताच्या स्मृती मंधानानं अग्रस्थान मिळवलं आहे. या मानांकनात तिची गुणसंख्या ८२८ आहे. दुसऱ्या क्रमांकावर

असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या अॅशले गार्डनरपेक्षा ती शंभराहुन अधिक गुणांनी पुढं आहे. तिची सलामीची जोडीदार प्रतिका रावल ५६४ गुणांसह २७ व्या स्थानावर आहे.

गोलंदाजीत, इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन ७४७ गुणांसह अग्रस्थानी आहे.

<><><><>

गुजरातमधे लोथल इथं प्रस्तावित असलेल्या राष्ट्रीय समुद्री नौवहन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं अनावरण आणि संशोधन अहवालाचं प्रकाशन केंद्रीय बंदरं, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीकच्या दुसऱ्या दिवशी झालं. भारताचा समुद्री नौकानयन क्षेत्रातला हजारो वर्षांचा प्रवास हा फक्त भारताचा नसून सर्व खंडांमधला परस्पर आदर आणि भागीदारीचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. समुद्री नौकानयन वारसा दिनाचं उद्घाटनही सोनोवाल यांनी केलं.

<><><><>

हिंदुस्तान एअरोनॉटिक्स ही सरकारी कंपनी आता एसजे -100 या प्रवासी विमानांचं उत्पादन करणार आहे. त्याकरता रशियातल्या सरकारी - खासगी भागीदारीतल्या युनायटेड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशन या कंपनीबरोबर हालने समझोता करार केला आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी या कराराचं स्वागत केलं असून आत्मनिर्भरतेकडे महत्त्वाचं पाऊल असं त्याचं वर्णन केलं आहे. एसजे -100 हे पहिलं स्वदेशनिर्मित प्रवासी विमान असेल असं त्यांनी सांगितलं आहे. या करारामुळे विमान उत्पादन क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील असा विश्वास सिंग यांनी व्यक्त केला आहे.

<><><><>

हवामान अनुकूल शेती विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबईत झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसंच कृषीमंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते.

<><><><>

पर्यावरण संवर्धनात भारताचं योगदान अधोरेखित करण्यासाठी मुंबई वातावरण सप्ताह जागतिक परिषद आयोजित केली जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी

मंत्रालयात झालेल्या बैठकीत सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी यावेळी परिषदेच्या बोधचिन्हाचं प्रकाशनही केलं. १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मुंबईत होणाऱ्या या परिषदेत ३०हून अधिक देशातले पर्यावरण तज्ञ आणि अभ्यासक सहभागी होतील असा अंदाज आहे.

<><><><>

नांदेड जिल्ह्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. नांदेड जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते,त्यावेळी ते बोलत होते.

<><><><>

**जालना** शहरासह जिल्ह्यात सकाळपासून ढगाळ वातावरण अधून-मधून पावसाच्या जोरदार सारी कोसळत आहेत. हवामान विभागानं जालना जिल्हयाला आज आणि उद्यासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. सततच्या पावसामुळे जिल्ह्यात वेचणीला आलेल्या कपसाचं नुकसान होत आहे.

<><><><>

ज्येष्ठ लेखक बाबू बिरादार यांचं आज नांदेड जिल्ह्यात देगलूर इथं निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. मराठी, उर्दू, कानडी, तेलगू, हिंदी या भाषा बोलणाऱ्या प्रदेशात राहून त्यांनी मराठीत लिखाण करून नावलौकिक मिळविला होता. बिरादार यांच्या मातीखालचे पाय, कावड, गोसावी, अग्निकाष्ठ, अंत:पुरूष, संभूती या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ४१ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं.

<><><><>

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली, तर कोकणात किंचित वाढ झाली.

//<><><><><>//